# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०४/०३/२०२२ (शुक्रवार)

---

## जिवे मारण्याचा प्रयत्न करणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन कळमेश्वर – अंतर्गत मौजा फेटरी इंडीयन ऑइल पेट्रोल पंप समोर ०८ कीमी पुर्व. यातील फिर्यादी चा मुलगा हा दिनांक ०३.०३.२०२२ चे ०९.३० ते १०.०० दरम्यान पेट्रोल पंप समोरील सिमेंटच्या कठड्यावर बसला असता, आरोपी त्या ठीकाणी आला व "त्याचेकडे का पाहतो" असे म्हणत, काहीही कारण नसताना शिवीगाळ करून हातबुक्कयाने मारहाण करू लागला. व आरोपीने त्याचे खिशातील चाकु काढून फिर्यादीचे मुलाचे छातीवर, कमरेवर, व मांडीच्या भागावर वार करत जिवे मारण्याचा प्रयत्न करत पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती रत्नमाला किशोर गायकवाड वय ४६ वर्ष रा वार्ड क्र ०३ फेटरी यांचे रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ३०७,३२३,५०४,५०६ भादवी सहकलम ३(२)(५),३(२)(५अ) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील आरोपी नामे – **नितेश बाबुलानल उरकुंडे वय २८ वर्ष रा वार्ड क्र ०३ फेटरी** यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सपोनी तेजराम मेश्राम पो स्टे कळमेश्वर, करीत आहेत.

## घरफोडी

पोलीस स्टेशन कोंढाळी – अंतर्गत मौजा मुर्ती १९ किमी पश्चीम. दिनांक ०२.०३.२२ चे ०९.०० वा ते दिनांक ०३.३.२२ चे ०९.०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे राहते घराचे कंम्पाउन्डचे मेन गेटचे कुलुप तोडुन घराचे दरवाज्याची कडी उचकटुन, आत प्रवेश करून, हॉल मधील लोंखडी कोठीचे झाकन उघडुन, त्यात ठेवलेले **नगदी ३०,८००/— रू व कपाटातुन जुने वापरते सोन्याचे दागीने एकुण किंमत ६२,५०० /—रू, व जुने वापरते चांदीचे दागीने एकुण किमत २,०००/— रू, असे एकुण ९५,३००/— रू** किमतीचा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे —सुरज हेमराजजी बन्नगरे वय २७ वर्ष रा. मुर्ती ता. काटोल जि. नागपूर यांचे रिपोर्टवरून पोस्टे कोंढाळी येथे कलम ४५४,४५७,३८० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री अजित कदम पोस्टे कोंढाळी मो नं ९११२९८५९२२ करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

पोलीस स्टेशन मौदा :— अंतर्गत रबडीवाला वाय पॉईट ०२ कि.मी पूर्व. दिनांक ०३.०३.२२ चे १४:०० वा यातील जखमी हा रोड क्रॉस करित असताना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक दिल्याने **मृतक नामे विजय मधुकर नेरकर वय ४० वर्षे रा. नागपूर हा गंभीररित्या जखमी होवून मरण पावला.**

सदर प्रकरणी फिर्यादी सर तर्फे भयामनाथ चौधरी पो.स्टे.मौदा यांचे रिपोर्टवरून पोस्टे मौदा येथे अज्ञात आरोपी वाहन चालकाविरूध्द येथे कलम २७९,३०४ (अ),भा.द.वि सहकलम १८४,१३४ /१७७ मो.वा.का अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ/भयामनाथ चौधरी पो.स्टे.मौदा हे करीत आहेत.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन खापा :–** अंतर्गत भेडारा शिवार ८ किमी दक्षीण. यातील टिप्पर क्र एमएच– ३१ बिएस ८७२९ चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन रॉगं साईड ला उभा असलेल्या ट्रक क्र एम–पी–२८ एच–ए–६४८९ ला मागुन धडक देंउन स्वताचे तसेच कंन्डक्टरचे किरकोळ जखमी होवुन ट्रक चे नुंकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पंकज प्रभाकर दुबे रा. इरोज सोसायटी नागपुर यांचे रिपोर्टवरून पो स्टे खापा येथे आरोपी चालक नामे– **रूपेश वामन अडागडे रा. सुरादेवी कोराडी नागपुर यांचे विरूध्द कलम २७९, ३३७ भा.द.वि. सहकलम १८४ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला**, सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चिश्तीया पोस्टे खापा मोक्र. ८८०५०४८७७७ करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन वेलतुर :–** अंतर्गत मौजा टाकळी १५ कि.मी. पश्चिम, यातील मृतक नामे– गायत्री दिनेश ईश्वरकर, वय २९ वर्ष रा टाकळी हीचे लग्न ५ वर्षापुर्वी झाले असुन तिची एक महिन्यापुर्वी डिलिव्हरी झाली, तेव्हापासुन तिची प्रकृती खराब राहत होती. यापुर्वी तिला तिच्या पतीने २–३ वेळा उपचाराकरीता मांढळ येथे दवाखान्यात नेले होते. दिनांक ०३/०३/२०२२ चे ०३/०० वा. यातील मृतकची अचानक प्रकृती खराब झाल्याने तिला प्रथोमपचाराकरीता डॉ.मेश्राम, कुजबा नंतर सरकारी दवाखाना मांढळ तेथुन ग्रामिण रुग्णयालय कुही येथे नेले असता तेथील डॉ. तपासुन दिनांक ०३.०३.२०२२ रोजी मृत घोषीत केले. .

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर गोमाजी ईश्वरकर वय ६० वर्ष रा. टाकळी यांचे रिपोर्टवरून पोस्टे वेलतुर येथे कलम १७४ जा.फौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गाचा पुढील स.पो.नि./ आनंद कविराज पो.स्टे. वेलतुर मो.नं. ८८८८२९१२३४ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**